# स्वप्नांचे सेतू !

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**स्वप्नांचे सेतू ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २२०/-

# स्वप्नांचे सेतू !

# १

दिवसाचा कोणता प्रहर आहे ते सांगता येऊ नये इतका प्रकाश मंद झालेला, सूर्यबिंब पूर्वेस आहे की पश्चिमेस आहे ते कळू नये अशी आकाशात ढगांची गर्दी झालेली. पावसाची वृष्टी जोराची नव्हे, बेताचीच. मधूनच थांबणारी, पुन्हा झिमझिम सुरू होणारी. वारा काही वेगानं घोंघावणारा नव्हे. मध्येच अगदी पडल्यासारखा वाटणारा, पुन्हा वाहणारा. एखाद्या दिव्याची वात तेल संपल्यामुळे अगदी क्षीण व्हावी त्याप्रमाणे एकंदर सृष्टीतलं चैतन्य मंदावलेलं, गळाठलेलं. झाडाझाडावरच्या पक्ष्यांची हालचाल भ्यायल्यासारखी, सुस्तावलेली. त्यांचे शब्द मलूल झालेले...

शय्यागृहात एका आरामखुर्चीवर पडल्या पडल्या बाल्कनीच्या दारातून दिसणारं ते दृश्य चंदा बघत होती, आणि वटपौर्णिमेच्या दिवशी सृष्टीचं हे असंच रूप कसं दिसतं असा काहीसा आश्चर्याचा विचार तिच्या मनात येत होता. तिचं मन एकदम तीस वर्षे मागं गेलं होतं, आणि ती अवघी पंधरा वर्षांची असताना आपल्या आईजवळ तिनं एक वेडा हट्ट केला होता तो प्रसंग तिच्या डोळ्यांपुढं उभा होता.......गोव्यातलं तिचं जन्मगाव तिला दिसत होतं. बैठ्या माडीचं ते छोटसं घर, चहूबाजूच्या अंगणात डोलणारी नारळी-पोफळीची झाडं, त्यांच्या जाळीतून दिसणारा देवळाकडे जाणारा लाल मातीचा रस्ता, अशीच ढगाळ कुंद हवा, दशदिशांतला प्रकाश असाच क्षीण झालेला, मधून मधून पडणारा असाच झिमझिम पाऊस ! ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षातली ही सृष्टीची अवस्था माणसाच्या अंत:करणात कसलीतरी अनामिक हुरहूर उत्पन्न करण्यासाठीच असते की काय

कुणास ठाऊक? बैठ्या माडीच्या खिडकीतून रस्त्याकडे नजर लावून बसलेल्या त्या पंधरा वर्षांच्या चंदाच्या मनात हुरहूर उत्पन्न झाली होती.

वटपूजा करण्यासाठी निघालेल्या गावातल्या बायका देवळाकडे जाणाऱ्या त्या लाल रस्त्यावरून चाललेल्या तिला दिसल्या होत्या. ठेवणीतली कोरी वस्त्रं नेसून, अलंकार घालून, पूजेचं साहित्य हातात घेऊन निघालेल्या त्या बायकांबरोबर आपण जावं अशी ओढ तिला वाटली होती. अशी ती कधी गेली नव्हती. जाण्याची तीव्र इच्छा तिला होत होती. अशा प्रकारे वटपूजेला जाण्यात काहीतरी विशेष सुख आहे असं तिला वाटत होतं. आणि जे हे सुख आजपर्यंत तिनं कधी घेतलं नव्हतं त्याबद्दलची हुरहूर ती अनुभवीत होती...तिनं खाली जाऊन आईला विचारलं होतं. तिच्या आईनं आश्चर्याचा उद्गार काढला होता, ''अगं पोरी, तुला खुळबिळ लागलं की काय?''...वटपौर्णिमेच्या दिवशी वटवृक्षाची पूजा इतर बायका करतात मग आपण का नाही करायची, असं चंदाच्या मनात आलं होतं, आणि तिनं आईला तो प्रश्न केला होता. तिच्या आईनं काही वेळ तिच्याकडे विचित्र नजरेनं रोखून पाहिलं होतं. जणू माणसं नेहमी पायावर का चालतात, डोक्यावर का नाही चालत, असाच अगदी मूर्खपणाचा प्रश्न तिच्या लेकीनं विचारला होता. मग ती म्हणाली होती, ''अगं चंदा, पंधरावं वर्ष लागलं तुला. न्हाती धुती झालीस. तुला आता मुंबईला धाडावी, एखाद्या चांगल्या बुवाकडे किंवा खाँसाहेबाकडं तुझं गाण्याचं शिक्षण पुढे होईल अशी व्यवस्था करावी, तुझ्यासाठी कुणी चांगला श्रीमंत शेट बघावा, असे आम्ही बेत करीत आहोत. आणि तू काय वेड्यासारखा प्रश्न करतेस? वटपूजेला जाऊ का काय विचारतेस? अगं, ही पूजा कुलीन सवाष्णीसाठी आहे. कुवार मुलींसाठी नाही आणि आपल्यासारख्या बायकांसाठी नाही. आपलं कुळ कलावंतिणीचं आहे''....

आईचं हे बोलणं चंदाला समजलं होतं, आणि समजलं नव्हतंही ! म्हणजे तिच्या आईच्या शब्दांचा अर्थ तिला कळला होता, परंतु तो तिला पटला नव्हता. मग ती परत वरच्या बैठ्या माडीत गेली होती, बसून राहिली होती. तिच्या मनातली हुरहूर ओसरली नव्हती. नटल्या थटलेल्या बायका वटपूजेसाठी ज्या रस्त्यानं चाललेल्या तिला दिसत होत्या त्या लाल रस्त्याकडे ती बघत राहिली होती. तो रस्ता हाकेच्याच अंतरावर होता. परंतु तो फार दूर असल्यासारखा तिला भासला होता. इतका दूर की तिथे तिला कधी पोचता येणार नव्हतं. तो रस्ता आणखी आणखी



दूर सरकत आहे असा विचित्र भास तिला झाला होता...मग एकदम जोराचा मुसळधार पाऊस सुरू झाला होता. तो लाल रस्ता, त्याच्या अलीकडचं अंगण, हे सारं दृश्य जलधारांच्या पडद्याआड अदृश्य झालं होतं. पाण्यानं आणि वाऱ्यानं झोडपल्या जाणाऱ्या नारळी पोफळीच्या फांद्या तेवढ्या वाकड्या तिकड्या हललेल्या तिला दिसत राहिल्या होत्या...

तीस वर्षं झाली होती त्या प्रसंगाला. त्या वेळची किशोरी चंदा आता मोठी झाली होती. वयानं, कीर्तीनं-साऱ्याच दृष्टींनी. परंतु ज्येष्ठ महिन्यातला शुक्ल पक्ष पुन्हा आला होता. वटपौर्णिमेचा दिवस पुन्हा उगवला होता. ढगाळ आकाश, मंद प्रकाश, झिमझिम पाऊस, असं रूप सृष्टीनं पुन्हा धारण केलं होतं. मनुष्यामात्राच्या अंत:करणात अनामिक हुरहूर स्फुरावी असा सृष्टीच्या या रूपात गुण होता. परंतु जीवनाच्या या रस्त्यावरून तीस वर्षांची वाटचाल करून गेलेल्या चंदाच्या मनातली आजची हुरहूर पूर्वीपेक्षा वेगळी होती. देवळाच्या आवारातल्या वटवृक्षाकडे जाणारा जो लाल रस्ता पंधरा वर्षांच्या चंदाला फार दूरचा वाटला होता, तो आता तसाच दूर राहिला नव्हता....ती स्वत: त्या रस्त्याला कधी लागली नव्हती. त्या रस्त्यानं जाण्याची लहानपणी ओढ ती आता विसरूनही गेली होती. परंतु तो रस्ता दूर राहिला नव्हता. कारण ती स्वत: जरी कलावंतिणीच्या पेशातच राहिली होती तरी तिनं आपल्या लेकीला गाणं न शिकविता शाळा कॉलेजातलं शिक्षण दिलं होतं. तिला पदवीधर केलं होतं. श्रीमंत खानदान कुटुंबातल्या मुलाशी तिचं लग्न लावून दिलं होतं. वटपूजा करण्याचा अधिकार तिला प्राप्त करून दिला होता. जो रस्ता तिच्या स्वत:च्या आवाक्यापलीकडे तिनं राहू दिला होता, तो तिच्या लेकीला खुला झाला होता.....शय्यागृहातल्या खुर्चीवर बसून झिमझिम पावसानं भिजणाऱ्या कुंद स्तब्ध हवेकडे बघणाऱ्या आजच्या पंचेचाळीस वर्षांच्या चंदाच्या मनातली हुरहूर वेगळी होती...

का कोण जाणे, एका व्यक्तीची आठवण तिला एकाएकी झाली होती. त्या व्यक्तीला ती आता विसरूनही गेली होती. परंतु विस्मरणाच्या खोल डोहातून त्या व्यक्तीची आठवण या घटकेला एकदम उसळून जाणिवेच्या पृष्ठभागावर आली होती. त्या व्यक्तीची भेट आता अशक्य होती. परंतु जे अप्राप्य ते प्राप्य व्हावं अशी तीव्र इच्छा उत्पन्न करण्याचा गुण ज्येष्ठ महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातल्या या

ओलसर स्तब्ध कुंद हवेत असतो की काय कुणास ठाऊक? वीस वर्षांत ज्याला तिनं पाहिलं नव्हतं, जो तिच्या आयुष्यातून वीस वर्षांपूर्वी निघून गेला होता, त्याची आठवण या पावसाळी हवेनं तिला एकाएकी करून दिली होती आणि त्या आठवणीच्या तीव्रतेनं एक विचित्र हुरहूर निर्माण केली होती........कारण त्याच्या आणि तिच्या ज्या भेटीनं तिचं सारं आयुष्य पालटून जाण्याचा संभव निर्माण झाला होता त्या भेटीच्या दिवशी अशीच हवा पडली होती असाच झाकळून गेलेला प्रकाश, असंच ढगांनी खचलेलं आभाळ, असाच मध्येच पडणारा, मध्येच वाहणारा वारा, अशीच मध्येच थांबणारी मध्येच सुरू होणारी पावसाची झिमझिम !.....

त्या वेळेस ती दादरच्या शिवाजी पार्कवरच्या या बंगल्यात राहत नव्हती. चौपाटीनजीक लॅबर्नम रोडसमोरच्या एका इमारतीत तिचं वास्तव्य होतं.

गोव्यातलं घर सोडून चंदाला घेऊन तिची आई मुंबईस आली होती. ती प्रथम काही दिवस कृष्णा काकोडकर नावाच्या मैत्रिणीकडे राहिली होती. चंदाचं सुस्वरूप, तिची निरोगी तब्येत, गोव्यात असतानाच गायनाचं शिक्षण घेताना तिनं दाखविलेले गुण, या भांडवलावर तिच्या आईनं मुंबई गाठण्याचा आणि मुलीचं नशीब पाहण्याचा प्रयोग केला होता. मुंबईतल्या गोवेकरांना चंदाच्या आईचा हिशेब बरोबरच वाटला होता, आणि त्या सर्वांनी चंदाच्या आईला भाकित सांगितलं होतं, की, ''बायो, तुझा जम बसायला वेळ लागायचा नाही.'' त्यांचं भाकित खरं ठरलं होतं. मैत्रिणीकडचं बिऱ्हाड बायोनं उचललं होतं आणि दोन देवळांसमोरची बऱ्यापैकी जागा मिळाली तेव्हा चंदनला घेऊन त्या जागेत ती राहू लागली होती.

कलावंतिणीचा पेशा करण्यासाठी मुंबईत येऊन राहणाऱ्या गोवेकरणींना दोन प्रश्नांची मोठी चिंता असते. गायनविद्येची उपासना करण्यासाठी गुरू चांगला मिळतो की नाही? आणि शेट चांगला मिळतो की नाही?...चंदाच्या सुदैवानं हे दोन्ही प्रश्न चांगल्या प्रकारे सुटायला फारसा अवधी लागला नव्हता.

गोव्याकडील एखादी तरुण मुलगी नव्यानं मुंबईत दाखली झाली की तिच्या आगमनाची वार्ता साऱ्या गोवेकर मंडळीत तर अल्प काळात प्रसृत होतेच, परंतु शिवाय संगीताच्या क्षेत्रातील कमीअधिक अधिकाराची माणसं आणि धनिक रसिक यांनादेखील ती वार्ता कळायला वेळ लागत नाही. बायो पैंगणकर आपल्या पंधरा वर्षांच्या लेकीला घेऊन मुंबईत स्थायिक होण्यासाठी आलेली आहे ही बातमी



कर्णोपकर्णी वेगानं पसरली. त्या काळात 'शुक्रवार क्लब' नावाचा क्लब मुंबईत होता. या क्लबाच्या जागेत प्रत्येक शुक्रवारी गाणंबजावणं होत असे. त्यात मोठे मोठे गायक, आणि त्यांनी तयार केलेल्या गोवेकरणी गात असत. कुणालाही बिदागी देण्यात येत नसे. तिकीट नसे. चाहेल त्यानं यावं, गाणंवाजविणं ऐकावं, असा सारा खुषीचा आणि हौसेचा मामला असे. या क्लबात चंदा चार-पाच वेळा गेली, एकदा तिनं स्वत: अर्धा तास गाऊन हजेरीही लावली. हिराबाई बडोदेकरांच्या नाटक कंपनीचा मुक्काम त्या वेळेस मुंबईत होता. त्यांच्या नाटकांनाही ती दोन वेळा गेली. ज्यांनी तिला बघितलं त्यांच्यात चर्चा सुरू झाली, ''ही कोण? कुठली? केव्हा आली? कुठे राहते? मुंबईत राहायसाठीच आली आहे का? हिचा शेट कोण?''

चंदाला घेऊन मुंबईत आलेल्या बायो पैंगणकरपुढे एक चमत्कारिक प्रश्न होता. तिच्यासारख्या बायकांना नेहमीच पडणारा असा तो प्रश्न होता. मुलीच्या गायनशिक्षणाची व्यवस्था आधी करावी, की आधी तिच्यासाठी शेट पहावा? ती चांगली शिकून तयार झाली, गायिका म्हणून तिनं लौकिक मिळविला, म्हणजे तिचा भाव साहजिकच वाढतो, आणि धनाढ्य रसिकात तिला ठेवण्याची अहमहमिका सुरू होते. परंतु उलट मुलीनं गायिका म्हणून नाव करावं यासाठी आधी तिचं गायनाचं शिक्षण काही काल होण्याची गरज असते, कुणातरी चांगल्या नामांकित गुरूचा गंडा बांधून विद्या करणं अगत्याचं असतं, यासाठी पैसा ओतावा लागतो, आणि पैशाची व्यवस्था व्हावी यासाठी कुणातरी चांगल्या शेटाच्या आश्रयाची गरज असते. चांगला शेट मिळवायचा तर चांगलं शिक्षण व्हायला हवं, आणि चांगलं शिक्षण व्हायला हवं असेल तर उदार आश्रय देणारा हौशी शेट हवा, असं हे विचित्र कोडं असतं. आधी कोंबडी की आधी अंडं अशापैकीच हा एक चमत्कारिक उखाणा आहे...बायो पैंगणकर चंदाला घेऊन मुंबईत आली तेव्हा हा कूट प्रश्न तिच्यापुढे उभा राहिलाच. चंदाचं सुस्वरूप म्हणजे एक मोठं भांडवल होतं, परंतु तेवढ्यानं भागण्यासारखं नव्हतं. कुलीन कुटुंबातल्या तरुण मुलीला सौंदर्याची देणगी असली की तिचा कार्यभाग साध्य झाल्यासारखा असतो. कारण तिला फक्त लग्न करायचं असतं. फक्त गृहिणीपद हवं असतं. फक्त संसार करायचा असतो. चंदासारख्या मुलीची गोष्ट निराळी असते. तिला कलावंतीण व्हायचं असतं...बायो पैंगणकरपुढे नेहमीचा अटळ असा कूट प्रश्न उभा राहिला होता. चंदाच्या गायन शिक्षणासाठी

चांगला गुरू आधी बघायचा, की एखाद्या चांगल्या शेटची आणि तिची गाठ आधी घालून द्यायची?

नाटकातल्या स्त्री भूमिका स्त्रियांनीच कराव्यात की करू नयेत या प्रश्नावर विद्वानात काही काळ झालेले कडाक्याचे वाद आता संपले होते. हिराबाई बडोदेकरांच्या कंपनीनं या प्रश्नाचं उत्तर देऊन टाकलं होतं. नाट्यमन्वंतरच्या रंगभूमीवर स्त्रियांची कामं प्रेक्षकांना बघायला मिळत होती. विद्वानांमधल्या वादाला स्त्रियांनी निर्णायक उत्तर दिलं होतं. पुरुषांनी केलेली स्त्रियांची कामं लोकांना बघायला नकोतशी वाटू लागली होती. ज्या त्या प्रमुख नाटक कपंनीच्या चालकांना वाटू लागलं होतं की एखादी चांगली सुस्वरूप नटी मिळाली तर ठेवावी. बालगंधर्वाच्या गंधर्व नाटकमंडळीत देखील या नव्या विचाराचे वारे वाहू लागले होते. बायो पैंगणकराची चंदा नाटकवाल्यांनी हेरली नसती तरच नवल होतं. एका नाटक कंपनीचे मालक बायोकडे आले, आणि त्यांनी तिच्याजवळ आपली इच्छा बोलून दाखविली.

चंदा अजून वयानं लहान होती, तिची गायनाची तयारीही बेताची होती, रंगभूमीचा तर काहीच अनुभव तिला नव्हता, इत्यादी शंका आणि अडचणी बायोनं त्यांना ऐकविल्या, परंतु नाटक कंपनीच्या मालकांच्या हिशेबानं या साऱ्या अडचणी बिनमहत्त्वाच्या होत्या. ''माणूस कसं तयार करावं ते आम्हाला माहीत आहे. तुमची मुलगी हुशार आहे, ती काय हां हां म्हणता तयार होईल. ती पूर्ण तयार झाली असं आम्हाला वाटल्याखेरीज आम्ही तिला बाहेर काढणारच नाही. जेव्हा तिला बाहेर काढू तेव्हा ती एकदम केवढा लौकिक मिळवील ते बघालच तुम्ही. तुम्ही काही चिंता करू नका. आमच्या स्वाधीन मुलीला करा म्हणजे झालं. किती अमोल रत्न तुमच्याजवळ आहे याची तुम्हाला कदाचित कल्पना नसेल. परंतु आम्हाला आहे.'' अशी भाषा त्यांनी बायोला पुन:पुन्हा ऐकविली. आणि मुख्य म्हणजे चांगल्या लठ्ठ पगाराचं आमिष तिच्यापुढे सारखं नाचविलं.

बायोला कळेना त्या लोकांना काय उत्तर द्यावं.

कृष्णाचा थोरला भाऊ बाबू काकोडकर बैठकीत होता. त्यानं बायोच्या वतीनं बोलण्याचा अधिकार घेऊन नाटकवाल्यांना सांगितलं, ''आपल्या म्हणण्याचा दोन दिवस शांतपणे विचार करू आम्ही, आणि मग काय ते आपल्याला सांगू.''



नाटक कंपनीचे मालक निघून गेले आणि मग दोन दिवस कृष्णीच्या घरात चर्चेचा दुसरा विषयच राहिला नाही. बातमी कशी पसरली कुणास ठाऊक; परंतु कृष्णा काकोडकरच्या मैत्रिणी, त्यांचे साजिंदे कृष्णाच्या बिऱ्हाडी येऊन बायोला विचारू लागले, ''अगो बायो, तुझ्या चंदाला नाटकवाल्यांची मागणी आली असो ऐकलो, खरो की काय?'' चौकशीसाठी येणाऱ्यांपैकी प्रत्येकानं आपला बहुमोल सल्लाही दिला. बहुमत असं दिसलं की बायोनं आपल्या लेकीला नाटकात घालावी. कृष्णादेखील हुरळून गेली होती, आणि बायोला पुन्हा पुन्हा सांगत होती, तुझ्या लेकीच्या नशिबानं बोलावणं आलं आहे, नाही म्हणू नकोस. कंपनीच्या मालकांनी चंदाच्या उत्कर्षाचं जे चित्र रंगविलं होतं ते बायोच्या डोळ्यांपुढून हलत नव्हतं, आणि मुख्य म्हणजे त्यांनी सांगितलेला लठ्ठ पगाराचा आकडा तिला भुरळ घालीत होता. लेकीनं नशीब काढलं तर जन्माचं दारिद्र्य फिटणार होतं.....

परंतु बाबूनं या साऱ्या उठावाला खंबीरपणानं मोडता घातला. कृष्णाला, बायोला आणि चंदाला रात्री एकीकडे घेऊन त्यानं आपली विचारसरणी सांगितली. चंदा वयानं लहान होती. गायनाचं शिक्षण तिनं घेतलं होतं खरं परंतु ते बेताचंच होतं. तिच्या तोंडात कोकणी भाषा होती. बोलण्यात गोव्याचे हेल होते. तिच्या अंगी मुख्य गुण होता तो सौंदर्याचा. रंगून, सजून साजशृंगार करून ती स्टेजवर आल्याबरोबर प्रेक्षकात कडकडून टाळी पडेल यात शंकाच नव्हती. इतकं देखणं मोहक स्त्री-पात्र मराठी रंगभूमीवर अजून कधी आलं नव्हतं. बडोदेकर भगिनी, ज्योत्स्ना भोळे, सौ. वर्तक अशा स्त्रिया नाटकातून कामं करीत होत्या खऱ्या, परंतु त्या साऱ्याजणी रूपानं सामान्य होत्या. चंदासारख्या स्वरूपसुंदर नटीचं प्रेक्षकांना घडणारं दर्शन म्हणजे मराठी रंगभूमीच्या इतिहासातली एक संस्मरणीय घटना ठरणार होती. नाटकवाले चंदावर भाळले होते ते तरी काय, तिच्या लावण्याचं मोठं भांडवल करता येईल, तिचा अभिनय आणि तिचं गाणं लोकांना सुमार वाटलं तरी तिच्या सौंदर्याची मोहिनी त्यांच्यावर पडेल, आणि केवळ तिला बघण्यासाठी ते 'हाऊसफुल' गर्दी करीत राहतील, असा नाटकवाल्यांचा उघड हिशेब होता म्हणूनच. पगाराचा लठ्ठ आकडा ते सांगत होते ते उगाच नव्हे. पण नाटकवाल्यांच्या भरीला बळी पडून आपण हरभऱ्याच्या झाडावर चढायचं की कसं याचा विचार आपण करायला नको का , असा प्रश्न बाबूनं पुढ्यात बसलेल्या त्या तिघींना विचारला, आणि प्रश्नाचं उत्तरही